महाराष्ट्र पोलीस

943
क्रमांक:पोआअ/पोशि-पोना-पोहवा-सपोउपनि जेष्ठता यादी-२१/ /२०२१.
पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यालय, कॅम्प
रोड, अमरावती, दुरध्वनी क्र.०७२१-२५५१००१,फॅक्स क्र.२५५१०१०,
ई मेल आयडी cp.amravati@mahapolice.gov.in
दिनांक /०२/२०२१ 4 FEB 2021

---

विषय :- **पोशि-पोना-पोहवा-सपोउपनि यांची दि.०१.०१.२०२१ रोजीची सेवाजेष्ठता सुची.**

*****

सोबत पोशि-पोना-पोहवा-सपोउपनि यांची दि.०१.०१.२०२१ रोजीची प्रारूप सेवा जेष्ठता सुची पाठविण्यात आलेली आहे. ती सर्व पोलीस अंमलदार यांचे निदर्शनास आणून द्यावे आणि प्रारूप जेष्ठता सुचीमध्ये काही चुक असल्यास ती कार्यालयाच्या निदर्शनास लेखी स्वरूपात आणून द्यावी. त्याचप्रमाणे कोणाचे काही आक्षेप असल्यास ते सुद्धा लेखी स्वरूपात कार्यालयात सादर करावे. याकरिता ७ दिवसाची मुदत देण्यात आली असून या ७ दिवसात कोणीही आक्षेप नोंदविला नाही अथवा सेवा जेष्ठता यादीतील चुक कार्यालयाच्या निदर्शनास आणली नाही तर, सदर सेवा जेष्ठता यादी ही बरोबर आहे असे समजण्यात येईल अशी ही त्यांना समज देण्यात यावी. संबधीत पोलीस अंमलदार यांना सेवा जेष्ठता यादी दाखविल्यानंतर त्यांची त्यांचे नावासमोर सही घेण्यात यावी.

सदर प्रारूप जेष्ठता यादीची झेरॉक्स काढून ती पोलीस ठाण्याच्या /शाखेच्या कार्यालयात असलेल्या सुचना फलकावर लावण्यात यावी. त्याचप्रमाणे सेवा जेष्ठता यादी ही पोलीस आयुक्त, अमरावती शहरचे http://www.amravaticitypolice.gov.in/ या संकेतस्थळावर सुद्धा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सहपत्र :- प्रारूप जेष्ठता सुची

**(विक्रम साळी)**
पोलीस उपायुक्त, (मुख्यालय)
अमरावती शहर

प्रति,

सर्व पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे/शाखा, अमरावती शहर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर
सहाय्यक पोलीस निरीक्षक, दंगा नियंत्रण पथक/जलद प्रतिसाद पथक, अमरावती शहर

प्रत,

पोलीस निरीक्षक, पो.स्टे.सायबर, अमरावती शहर

२/- **यासोबत पाठविण्यात आलेली पोशि-पोना-पोहवा-सपोउपनि यांची जेष्ठता सुची आपले पोलीस आयुक्त, अमरावती शहरचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.**

Scanned with CamScanner